# जाहिरातीचा नमुना

**पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पुणे** 411019

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड या कार्यालयाचे आस्थापनेवर कंत्राटी पद्धतीने ४ (चार) विधी अधिकारी यांची रिक्त पदे भरावयाची आहेत. सदर पदाकरीता लेखी परीक्षा ५० गुणांची व तोंडी परीक्षा २५ गुणांची घेण्यात येणार आहे.

खालील नमुद विधी अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यासाठी नमूद अटी व पात्रता पूर्ण असलेल्या उमेदवारांकडून ११ महिन्यासाठी पूर्णतः कंत्राटी पद्धतीने नियुक्तीसाठी दि. २४/०४/२०२६ पर्यंत विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. त्यानंतर उशिराने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | पदनाम | रिक्त पदांची संख्या | मानधन |
|---|---|---|---|
| 1 | विधी अधिकारी | ०४ | मासिक देय रक्कम रु.२०,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्च रु.३,०००/- |

अर्ज करण्याची सविस्तर माहिती या कार्यालयाचे www.pcpc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

हेल्पलाईन नं. ०२०-२७३५२५००
ठिकाण - पिंपरी चिंचवड
दिनांक - १६/०४/२०२६

( गणेश इंगळे )
**पोलीस उप आयुक्त, मुख्यालय,**
**पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड**

# अर्जाचा नमुना

**कंत्राटी विधी अधिकारी पदासाठी अर्ज**

| उमेदवाराचा फोटो |
|---|

**कार्यालयीन उपयोगासाठी**

१.अर्ज क्रमांक :-

२.अर्ज स्विकारल्याचा दिनांक :-

३.अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह) :-

सुचना :- १.अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी. आवश्यक नसेल ते खोडावे.

२.अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावे.

**अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती**

१.अर्जदाराचे संपुर्ण नाव : आडनाव / नाव / वडीलांचे-पतीचे नाव

मराठीत :-

इंग्रजीत :-

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :-

१. कायमचा पत्ता :-

२. दुरध्वनी क्रमांक :- भ्रमणध्वनी दिनांक :-

३. जन्म दिनांक :-

४. दि. ३०/०९/२०२५ रोजीचे वय :- ( दिवस/ महिना/ वर्ष)

५. लिंग :- पुरुष / महिला

६. धर्म :- जात :-

७. क्रिमीलिअर आहे काय :- होय / नाही

८. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का :- होय / नाही

## इ) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

९. शैक्षणिक अर्हता :-

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विद्यालय/महाविद्यालय) | बोर्ड/ विद्यापीठ | उत्तीर्ण झालेचा दिनांक | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी) | | | | | |
| उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा (इ.१२ वी) | | | | | |
| पदवी | | | | | |
| विधी पदवी | | | | | |

१०. इतर शैक्षणिक अर्हता :-
अ) संगणक प्रशिक्षित आहात काय

ब) प्रत्यक्ष वकिली व्यवसायाचा किती वर्षाचा अनुभव आहे

११. अर्जदाराची इतर माहिती :-
अ) सनद घेतल्याची दिनांक :-

ब) उमेदवाराने स्वतः हाताळलेल्या केसेसचा तपशिल :-

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

टिप :- अ.क्र. ११,१२ व १३ (अ) मध्ये नमुद असलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रत अर्जासोबत असणे आवश्यक आहे.

१२. (अ) अर्जदारावर यापुर्वी कोणत्याही अपराधाबाबत अटक करण्यात/ स्थानबद्ध करण्यात/ दंड करण्यात/ सिद्धोषी ठरविण्यात आले आहे काय? किंवा लोकसेवा आयोगाकडुन त्यांच्या परिक्षांना/ निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय?, किंवा कोणत्याही विद्यापिठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडुन/ संस्थेकडुन कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय?, काढुन टाकण्यात आले आहे काय?
(ब) हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापिठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराबाबत कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय?

(१४ अ व ब चे उत्तर होय असेल तर प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरुप स्पष्ट करावे)

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री/सौ/कु. ------------------------------------------------------------------------------------------------, याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणिवपुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असुन ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णतः जबाबदारी माझ्यावर राहिल व त्याबाबतीत माझ्याविरुद्ध कायदेशिर कारवाईस मी पात्र राहिल. तसेच मी भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र राहिल.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी<br>(दिनांकासह)

## संकेत स्थळावर द्यावयाची माहिती

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड या कार्यालयाचे आस्थापनेवरील " **विधी अधिकारी** " यांची रिक्त पदे पूर्णतः कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत..

-----------------------------------------------------------------------------------------------------जाहिरात क्र.

पो आ पिं चिं/आस्था-१/वि.अ.भरती/२०२५ दि. /३/२०२४

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड या कार्यालयाचे आस्थापनेवर कंत्राटी पद्धतीने " **विधी अधिकारी** " यांची रिक्त पदे भरावयाची आहेत.

खालील विधी अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यासाठी नमूद अटी व पात्रता पूर्ण असलेल्या उमेदवारांकडून ११ महिन्यासाठी पुर्णतः कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | मानधन |
|---|---|---|---|
| १ | विधी अधिकारी | ०४ | मासिक देय रक्कम रु.२०,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चासाठी रु.३०००/- |

**सुचना :-**

१. उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन त्यासोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रती जोडून लिफाफ्यात घालून लिफाफ्याचे उजव्या बाजूला ठळक अक्षरात **" विधी अधिकारी पदासाठी अर्ज "** असे नमूद करुन अर्ज दि. /०३/२०२४ रोजी ठिक १८.०० वाजेपर्यंत पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड , पुणे-४११०१९ या कार्यालयाचे पत्यावर वेळेत सादर करावेत.
२. दि. /३/२०२४ रोजी १८.०० वा.नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
३. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेला एक लिफाफा पोस्टाचे तिकीट लावून जोडावा.
४. अर्जाचा नमुना www.pcpc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन अर्ज परिपूर्णरित्या भरावा.
५. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड कार्यालयात वरील मुदतीत हस्तेदेखील अर्ज स्विकारले जातील.

**अटी व शर्ती**

१. विधी अधिकारी या पदाची नेमणूक पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल.
२. उमेदवाराला शासकीय अधिकारी/कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
३. सदर नेमणूक हया करार नियुक्ती पध्दतीने प्रथमतः ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा ११ महिन्याकरीता) वाढविता येईल. ३ वेळा मुदत दिल्यानंतरही अशा उमेदवारांची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे, असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्चः निवढ प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.
४. निवड केलेला उमेदवार ११ महिन्याच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगीशिवाय करु शकणार नाही. जर खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे उमेदवारांची नियुक्ती रद्य करण्यांत येईल. तसेच अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
५. उमेदवारांची १०० गुणांची मौखिक परिक्षा घेण्यात येईल.
६. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना पत्राव्दारे व एसएमएसव्दारे कळविण्यात येईल.
७. उमेदवारांना मुलाखतीस, कागदपत्र तपासणीस आलेवर कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.
८. नियुक्ती केलेल्या उमेदवारांस या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहिल.

९. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या विधी अधिकारी यांचे एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्च व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

१०. उमेदवारांनी, खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दि. / /२०२० पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे.

११. अर्जासोबत सध्याचे काढलेले ४ रंगीत फोटो जोडावेत.

१२. उमेदवाराची पात्रता, भरती प्रक्रिया इ. विषयी निर्णय घेण्याचा सर्व अधिकार हा निवड मंडळास राहील व तो सर्व उमेदवारांवर बंधकारक राहील.

**शैक्षणिक अर्हता व अनुभव**

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायदयाचा पदवीधर असेल तो सनद धारक असेल.

२. विधी अधिकारी पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.

३. उमेदवार गुन्हेगारी विषयक,सेवाविषयक,प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

५. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ५० वर्षापेक्षा जास्त नसेल किंवा

६. जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाल हाजाळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्यांचप्रमाणे मा.सर्वाच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायदयाचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**करारातील मासिक देय रक्कम**

विधी अधिकारी या पदाकरीता करारातील मासिक देय रक्कम रु.२०,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चासाठी रु.३०००/- देय राहील. इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

**विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदा-या**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशा तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशाप्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.

४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भा उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.